महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/थेट द्वितीय वर्ष पदविका/२०२४/ प्रवेशाचा अंतिम दिनांक सुधारित /४६१ दिनांक :२६ /०९/२०२४

## प्रवेशासाठीचा सुधारित अंतिम दिनांक
## शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम
## (थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या वर्किंग प्रोफेशनल्स (कार्यरत व्यावसायिक) उमेदवारांच्या स्वतंत्र तुकडीचे प्रवेश समाविष्ट)

मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल IA No. २१०५३८/२०२४, दिनांक २३.०९.२०२४ मधील आदेशानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) या शिखर परिषदेद्वारे त्यांनी त्याचे परिपत्रक क्र. AICTE/RB-AC-cir/२०२४, दिनांक २४ सप्टेंबर २०२४, अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता सुधारित शैक्षणिक वेळापत्रक घोषित केले आहे. एआयसीटीईच्या सुधारित वेळापत्रकानुसार रिक्त जागांसाठी प्रवेश करण्याचा अंतिम दिनांक २३-१०-२०२४ हा आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता पुर्णवेळ थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशप्रक्रियेसाठी सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक, संस्थांनी डेटा अपलोड करण्याचा शेवटचा दिनांक या प्रक्रियेच्या वेळापत्रकामधील वदलांच्या माहितीसाठी ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे. यामध्ये थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या वर्किंग प्रोफेशनल्स (कार्यरत व्यावसायिक) उमेदवारांच्या स्वतंत्र तुकडीची प्रवेश प्रक्रियादेखील समाविष्ट करण्यात आलेली आहे.

| अनु. | प्रक्रिया | सुधारित दिनांक |
|---|---|---|
| १. | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठीच्या सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक | २३-१०-२०२४ |
| २. | संस्थांसाठी: डेटा अपलोड करण्याची शेवटची तारीख (प्रवेशित झालेल्या उमेदवारांचा तपशील) | २३-१०-२०२४ |

टिप:

१. प्रवेशप्रक्रियेच्या कॅप व्यतिरिक्त जागांसाठी ऑनलाईन नोंदणी व कागदपत्रांची पडताळणी, अर्ज निश्चिती करणे या प्रक्रिया प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत (कट ऑफ डेट पर्यंत) सुरू ठेवल्या जातील.

२. संस्थास्तरावरील कोट्यामधे व कॅपनंतर रिक्त राहिलेल्या जागांत प्रवेश घेण्यास इच्छुक उमेदवारांनी ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत याद्वारे नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज भरल्याची निश्चिती करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी प्रवेशासाठी संस्थांमध्ये स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांची गुणवत्तायादी, संस्था पातळीवर संस्थेद्वारे तयार केली जाईल.

३. ज्या उमेदवारांनी प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीचा पर्याय निवडला आहे असे उमेदवार सुविधा केंद्रात उपलब्ध असलेल्या आयटी सुविधेचा वापर करून त्यांचे अर्ज भरणे, स्कॅनिंग करणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज निश्चित करणे या कामाकरिता विनाशुल्क लाभ घेऊ शकतात.

४. प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीसाठी : सुविधाकेंद्रांची (एफसीची) यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे आणि ही सुविधाकेंद्रे नियोजित काळात सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

५. प्रवेशासाठी पात्रता व नियम संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

६. वरील घोषित वेळापत्रक हे अस्थायी स्वरुपाचे आहे आणि यामधे अपरिहार्य स्थितीमधे बदल संभवु शकतो. जर, सुधारित वेळापत्रक घोषित झाले तर ते **https://dsd24.dtemaharashtra.gov.in/** या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. अधिक माहितीकरिता संकेतस्थळावर अथवा संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्या कार्यालयामध्ये संपर्क साधावा.

७. चौकशी करिता व आयटी सुविधे करिता जवळच्या सुविधा केंद्राशी संपर्क साधावा.

८. मदतकक्ष क्रमांक **7669100257/18003132164** सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**महत्वाची सूचना :**
**सर्व सहसंचालक, सर्व जिल्ह्याचे नोडल अधिकारी, सुविधा केंद्र अधिकारी व सर्व पदविका संस्था यांचे साठी**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका अभ्यासक्रमामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेण्याचा व तदनंतर उर्वरित रिक्त जागांसाठी संस्था स्तरावर प्रवेश घेण्यासाठीचा अभ्यासक्रम निहाय अंतिम दिनांक खालील प्रमाणे होती. तथापि दि. २६ सप्टेंबर २०२४ च्या संचालनालयाच्या अधिसूचनेनुसार संस्था स्तरावरावरील रिक्त जागांवर प्रवेश घेण्यासाठीचा सुधारित **अंतिम दिनांक २३ ऑक्टोबर २०२४** असा आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | संस्था स्तरावर प्रवेश घेण्यासाठीचा पूर्वीचा अंतिम दिनांक | संस्था स्तरावर प्रवेश घेण्यासाठीचा सुधारीत अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | दहावीनंतरच्या प्रथम वर्ष पदविका | ३ सप्टेंबर २०२४ | १० सप्टेंबर २०२४ | २३ ऑक्टोबर २०२४ |
| २ | थेट द्वितीय वर्ष पदविका | ४ सप्टेंबर २०२४ | १३ सप्टेंबर २०२४ | |
| ३ | प्रथम वर्ष पोस्ट एचएससी (बारावी नंतरचे) पदविका हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान, सरफेस कोटींग तंत्रज्ञान | १० सप्टेंबर २०२४ | १३ सप्टेंबर २०२४ | |

या अनुषंगाने सर्व पदविका संस्थांनी संस्था स्तरावरावरील रिक्त जागांवर प्रवेश करतांना खाली दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी.

१) प्राचार्यांनी संस्थेमध्ये शाखानिहाय रिक्त राहिलेल्या जागांवरील संस्था-स्तरावरील प्रवेश माहिती पुस्तिकेतील नियम क्र १३ (पृष्ठ क्रमांक ४३) नुसार करावयाचे आहेत याची नोंद घ्यावी.

२) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या फेरीनंतर EWS व TFWS यातील रिक्त राहिलेल्या जागा संस्था-स्तरावर भरण्यात येऊ नयेत.

३) **ज्या विद्यार्थ्यांनी दि. १० सप्टेंबर २०२४ नंतर संस्थेत अर्ज सादर करून प्रवेश रद्द केलेला आहे अश्या विद्यार्थ्यांचा प्रवेश Online पद्धतीने रद्द करण्यासाठी संस्थांनी त्यांच्या लॉगीन मधून "Update Cancel Admission (after cut of Date)" या लिंकवर सदर विद्यार्थ्यांचे Application ID टाकून त्यांचे प्रवेश रद्द करून घ्यावेत व त्यानंतर उपलब्ध रिक्त जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.**

४) **सदर लिंक दि. २७ ते ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत (४ दिवस) सुरु असणार आहे त्यामुळे सर्व संस्थांनी त्यांच्या संस्थेतील Manual पद्धतीने रद्द झालेले प्रवेश वरील लिंक द्वारे update करून घ्यावेत.**

५) त्यानंतर दि. १ ऑक्टोबर २०२४ पासून सर्व विद्यार्थ्यांसाठी Online पद्धतीने प्रवेश रद्द करण्याची सुविधा देण्यात येईल व सदर सुविधा सुधारित अंतिम दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ पर्यंत सुरु राहील.

६) रिक्त जागांवरील प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज निश्चितीची प्रक्रिया पुनश्चः सुरु करण्यात येत असून या बाबतीत सर्व सुविधा केंद्रांनी (प्रत्यक्ष स्कुटिनी किंवा ई- स्कुटिनी द्वारे) प्राप्त अर्जांची रोजच्या रोज तातडीने पडताळणी करून अर्ज निश्चिती करण्यात यावी.

७) अधिक माहितीसाठी का.क्र १० किंवा का.क्र ३ शी संपर्क साधावा.

सर्व जिल्हा **नोडल अधिकारी (District Nodal Officer)** यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सुविधा केंद्रांच्या अधिकाऱ्यांना वरील बाबतीत अवगत करावे व तसेच सदर अर्ज निश्चित करण्यासंदर्भात व सदर विद्यार्थ्यांशी संपर्क साधून अर्ज भरण्यासंदर्भातील अडचणींचे निवारण करण्याच्या सूचना द्याव्यात.

डॉ. उमेश कोकाटे,
प्रणाली व्यवस्थापक,
तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई